"केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना सन २०२४-२५ अंतर्गत भाग-३ - Development of Iconic Tourist Centres to Global Scale या योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांना दुसऱ्या हप्त्यातील निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

शासन निर्णय क्रमांक शिकाना २०२४/१२/प्र.क्र.२२४/पर्यटन-१

दिनांक : १२ जून, २०२६.

**संदर्भ :-** १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. टिडीएस २०२४/१२/प्र.क्र.२२१/ पर्यटन-१, दि.२७/१२/२०२४.

२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. टिडीएस २०२५/०१/प्र.क्र.१३/ पर्यटन-१, दि.०५/०२/२०२५.

३. सहाय्यक संचालक (PF-S), वित्त मंत्रालय (व्यय विभाग) यांचे आदेश क्र.४४(१)/PF-S/२०२६-२७/CAPEX-Maharashtra-SACE-२०, दि.०४/०६/२०२६

**प्रस्तावना :-**

"केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य सन २०२४-२५ या योजनेच्या भाग-३ Development of Iconic Tourist Centres to Global Scale या भागांतर्गत केद्र शासनाने मंजुर केलेल्या रु.१४६.०५ कोटी रकमेपैकी सन २०२४-२५ या चालु वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूदीमधून EX-INS Guldar Underwater Museum, Artificial Reef and Submarine Tourism, Sindhudurg व Development of RAM-KAL-PATH at Nashik या दोन प्रकल्पासाठी पहिल्या हप्त्यातील रु.९६.३९३० कोटी (६६%) इतका निधी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय व संदर्भ क्र.२ येथील शासन शुध्दीपत्रकान्वये या प्रकल्पासाठी कार्यान्वयीन यंत्रणा असलेल्या महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व महानगरपालिका नाशिक यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुषंगाने, संदर्भ क्र.३ येथील आदेशान्वये केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयामार्फत दुसऱ्या हप्त्यातील मंजूर करण्यात आलेला **रु.४९.६५७ कोटी** निधी सदर प्रकल्पासाठी वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य सन २०२४-२५ या योजनेच्या भाग-३ Development of Iconic Tourist Centres to Global Scale या भागांतर्गत केंद्र शासनामार्फत संदर्भ क्र.३ येथील आदेशान्वये मंजूर आलेला दुसऱ्या हप्त्यातील रु.४९.६५७ कोटी (३४%) निधी खालील तक्ता "अ" येथील स्तंभ क्र.७ प्रमाणे उद्दिष्टनिहाय वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्याचा उद्दिष्टनिहाय तपशिल तक्ता "ब" प्रमाणे आहे :-

<u>तक्ता “अ”</u> (रु.कोटीत)

| अ.क्र | प्रकल्पाचे नाव | अंमलबजावणी यंत्रणा | मंजूर रक्कम | उद्दीष्ट | यापुर्वी वितरीत निधी (६६%) | या आदेशान्वये वितरीत निधी (३४%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १) | EX-INS Guldar Underwater Museum, Artificial Reef and Submarine Tourism, Sindhudurg | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | ४६.९१ | **<u>५३-मोठी बांधकामे</u>** | ६.४२३८ | १०.०० |
| | | | | ५३-मोठी बांधकामे | १८.११२९ | |
| | | | | ५०-इतर खर्च | ६.४२३८ | ५.९४९५ |
| २) | Development of “RAM-KAL-PATH” at Nashik | नाशिक महानगरपालिका | ९९.१४ | **<u>५३-मोठी बांधकामे</u>** | १३.५७६२ | ९.०० |
| | | | | ५३-मोठी बांधकामे | ३८.२८०१ | |
| | | | | ५०-इतर खर्च | १३.५७६२ | २४.७०७५ |
| | | | **एकूण** | **१४६.०५** | **९६.३९३०** | **४९.६५७** |

<u>तक्ता -”ब”</u>

| उद्दिष्ट | देयकांची रक्कम (रुपये कोटीत) |
|---|---|
| ५३-मोठी बांधकामे | १९.०० |
| ५०-इतर खर्च | ३०.६५७ |
| **एकूण** | **४९.६५७** |

२. उपरोक्त प्रकल्पासाठी वितरीत केलेला निधी मागणी क्र. **“झेडडी-०५, ५४५२ पर्यटनावरील भांडवली खर्च, ०१ पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, (०१) केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत बिनव्याजी कर्ज, (०१) (०१) भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५ (योजना-भाग-३) अंतर्गत आयकॉनिक पर्यटन केंद्राचा विकास (केंद्र हिस्सा १०० %) कार्यक्रम, (५४५२ ०२२२) ५३-मोठी बांधकामे व ५० इतर खर्च** या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ मधील मंजुर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून खर्ची घालण्यात यावा.

३. सदर देयके बिनशर्त स्वरुपाची असून उपरोक्त लेखाशिर्षाखालील निधी आहरीत करण्यासाठी अवर सचिव, रोख शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना “**आहरण व संवितरण अधिकारी**” तसेच, सह / उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मुंबई यांना **“नियंत्रण अधिकारी”** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. १ येथील तक्त्यातील स्तंभ क्र.७ मध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम “आहरण व संवितरण” अधिकारी यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्याकडे देयके सादर करुन या योजनेशी संबंधित महाराष्ट्र बँक, मंत्रालय शाखा यांच्यामार्फत तयार करण्यात आलेल्या व **परिशिष्ट “अ” येथे नमूद केलेल्या SNA बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात यावी.** तसेच याबाबतच्या खर्चाच्या ताळमेळाची कार्यवाही पर्यटन -१ कार्यासनामार्फत करण्यात यावी.

५. सदर योजनेसाठी पर्यटन विभाग, शासन निर्णय दि.०४/१०/२०२४ अन्वये संचालक, पर्यटन संचालनालय यांना State Mission Director म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार, त्यांनी सदर योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पाबाबत वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर

करुन कामांच्या प्रगतीबाबतचा मासिक अहवाल शासनास सादर करण्याबाबत अंमलबजावणी यंत्रणांशी समन्वय करावा. तसेच, केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजनेच्या भाग-३ अंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या निधी संदर्भात महालेखापाल कार्यालय यांनी विहीत केलेल्या नमून्यात लेख्यांचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

६. या आदेशाने वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने ज्या प्रकल्पांसाठी मंजुर केला आहे, त्याच प्रकल्पासाठी व त्यातील प्रयोजनासाठी खर्च होईल यांची जबाबदारी संबंधित यंत्रणांची राहील.

७. केंद्र शासनाचे वित्त मंत्रालय व राज्य शासनामार्फत वेळोवळी देण्यात येणाऱ्या सुचना व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करुन प्रकल्प निहाय वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६१२१२२५२४८२२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH V ROKADE

Digitally signed by SANTOSH V ROKADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=CA5751FFEDBB005FDFF34AB6AC1F8319D061483D7D35E20F744E251360F7920A, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=ECF4A9ABE84C70DE989C3669424C12B6CADCB583D500FE489CE8727916E0BBEE, cn=SANTOSH V ROKADE
Date: 2026.06.12 12:26:55 +05'30'

**(संतोष जया विठ्ठल रोकडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (राऊशु) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय मुंबई.
१०. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
११. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१३. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, नाशिक
१५. आयुक्त, महानगरपालिका नाशिक, नाशिक
१६. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
१७. वित्त विभाग (का.व्यय-१५/ अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.
१८. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), पर्यटन व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. निवडनस्ती (पर्यटन-३)

# परिशिष्ट “अ”

बँक खाते तपशिल खालील प्रमाणे :-

| | |
|---|---|
| **SNA Agency Name** | Tourism and Cultural Affairs Department, Maharashtra |
| **Account Name** | PART III DEVELOPMENT OF ICONIC TOURIST CENTRES TO GLOBAL SCALE |
| **A/C NO.** | 60517648812 |
| **IFSC Code** | MAHB0001388 |
| **MICR Code** | 400014000 |
| **Branch Code** | 1388 |

***